नियमीत फौ. ख. क्र. ८६/२०२५
सरकार -वि.- अभय व इतर
नि.क्र. १८.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - देविदास दशरथ कुरुडकर,
वय ३५ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – कारगाव, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री जी.बी.राऊत यांचे मार्फत</u>**

१. दिनांक ०५.०४.२०२५ रोजी पोलिसांनी मला समन्स दिला होता. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येते. पोलिसांनी त्यानंतर घटनास्थळी एक टिप्पर ज्यामध्ये रेती होती तो जप्त केला व तसा पंचनामा तयार केला. पोलिसांनी तो पंचनामा मला वाचून दाखविला व माझी सही घेतली. आता मला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येते. त्यावेळी दुसरा पंच नितेश भोगे होता. ज्या व्यक्तींकडून टिप्पर जप्त केला त्यांना मी ओळखू शकत नाही. साक्षीदार सांगतो समोर पाहिल्यास ओळखू शकतो.

सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री हुंगे यांचे मार्फत</u>**

२. मी तीन वर्षांपासून उपसरपंच पदावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मला प्रशासकीय कामात मदत करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, माझा पोलिसांशी संपर्क असतो. मी एका कागदावर सही केली

होती. मी किती सह्या केल्या त्या मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांच्या सांगण्यावरुन सह्या केल्या. मी घटनास्थळावर एक सही केली होती. मी पंचनाम्यावर सही केली होती. मी पंचनामा वाचून पाहिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, जोपर्यंत एखादी कागद आपण वाचत नाही तोपर्यंत आपण कशावर सही केली सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा वाचून पाहिला नाही. पंचनामा १२.३० ते १.३० वा. दरम्यान केला होता. हे मी सांगू शकत नाही की, पोलिसांनी रेतीची मोजणी केली होती किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कुठलाही पंचनामा केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांशी हात मिळवणी करुन आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कुठल्याही कागदावर सह्या केल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक – २७.०१.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.